महाराष्ट्र शासन
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

## परिपत्रक

क्र.संवैशिवसं/ज्येष्ठ नागरिक/प्रलंबित मागण्या/ /अ-६/२०२३, दि: ०९/११/२०२३

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी सहयाद्री राज्य अतिथीगृह येथे पार पाडलेल्या बैठकीचे इतिवृत्त..
**ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्या.**

संदर्भ शासन पत्र क्र.वैशिवि-२०२३/सं.क्र.८४९/प्रशा-२, दिनांक २३ ऑक्टोंबर, २०२३.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी शासन पत्र व अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दिनांक १९.०६.२०२३ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

०२. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी सहयाद्री राज्य अतिथीगृह येथे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. **( इतिवृत्त संलग्नित )**

| मुद्या - ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य चाचणी/तपासणी शासनामार्फत व्हावी. | |
|---|---|
| अ.क्र. | मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश |
| १. | राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांच्या मार्फत ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य चाचणी/तपासणी करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले. |
| २. | यासाठी सर्व ज्येष्ठ नागरिकांना आभा कार्ड देण्यात येवून त्यांना सुपर स्पेशालिटी दवाखान्यात सुध्दा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. |
| ३. | दुर्देवाने काही आजार आढळून आल्यास त्यावर महात्मा फुले जनआरोग्य योजनामधून मोफत उपचार मिळावेत यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनामध्ये अटी व शर्ती मध्ये सर्व ज्येष्ठांमध्ये समावेश करावा. |
| ४. | ज्येष्ठ नागरिकांची राज्यातील १.५० कोटी संख्या विचारात घेता सर्व रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या तपासणीसाठी डॉक्टर व संबंधित चाचणी /तपासण्याकरिता आठवडयातील दोन दिवस राखीव ठेवण्यास यावेत. |
| ५. | Pallative Care Ward यांची टप्प्या टप्प्यात वाढ करण्यात यावी. |

तरी, वरीलप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रत :-

मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रु. आवार ९ वा मजला मुंबई ४०० ००१.